| | |
|---|---|
| MHKO030026082013 | **<u>स.फौजदारी खटला नं.१४४१/२०१३</u>**<br>निशाणी नं.८५ खालील आदेश<br>प्रकाश गिरीधर केसवानी वि.<br>चवगोंडा आण्णासो पाटील |

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ प्रमाणे त्यास प्रस्तुत प्रकरणातून मुक्त करण्यात यावे याकरीता दाखल केला आहे.

आरोपीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

२. फिर्यादीने प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द दि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे दाखल केलेला आहे. आरोपीविरुध्द चार्ज ठेवणे इतपत पुरावा नसल्याने दोषमुक्त करणेत यावे. आरोपीने कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा केलेला नसून त्याचा कोणत्याही प्रकारे सक्रिय, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष गुन्हयामध्ये सहभाग नाही. फिर्यादीचे कथनाप्रमाणे आरोपीने कोणत्याही बँकेचा कोणत्याही चेकच्या रक्कमेचा अपहार करुन त्या रक्कमेचा आरोपीने स्वतःसाठी किंवा इतरांसाठी वापर केलेला नव्हता व नाही व तशी केस फिर्यादीची नाही. आरोपीने फिर्यादीस कधीही कुठल्याही बँकेचा चेक कोणत्याही कारणाकरीता फिर्यादीस चुकीची सही करुन दिलेला नव्हता व नाही. फिर्यादी व आरोपीमध्ये कोणताही व कसलाही व्यवहार घडलेला नव्हता व नाही. फिर्यादीने आरोपीविरुध्द कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. आरोपी याचेकडून अशी कोणतीही रक्कम किंवा दस्तऐवज जप्त केलेले नव्हते व नाही. आरोपी विरुध्द चार्ज ठेवणे इतपत तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा दिसून येत नाही. उपरोक्त कारणांचा विचार होऊन यातील आरोपीविरुध्द चार्ज ठेवणे इतपत पुरावा नसल्याने आरोपीस दोषमुक्त करण्यात यावे. करीता प्रस्तुतचा अर्ज.

फिर्यादीचे प्रस्तुत अर्जास नि.८६ थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे–

३. आरोपीची अर्जामधील सर्व कथने चुकीची आहेत. फिर्यादीने प्रस्तुत खटला सन २०१३ साली दाखल केला असून आरोपीने खटला प्रलंबित ठेवण्याकरीता प्रस्तुत अर्ज

दाखल केला आहे. आरोपीने प्रस्तुत अर्जासारखाच नि.३९ वर अर्ज दाखल केला होता. त्यामुळे तशाच प्रकारचा अर्ज दाखल करण्याचे कारण अर्जामध्ये नमूद केलेले नाही. सदर कामी आरोपीचे निवेदन नोंदविलेले आहे. आरोपीने दोषमुक्त करण्याकरीता कोणतेही कायदेशीर कारण नमूद केलेले नाही. सदरचा अर्ज चालणेस पात्र नसल्याने नामंजूर करण्यात यावा. करीता म्हणणे असे.

४. प्रस्तुत अर्ज व म्हणण्याचे सूक्ष्मपणे वाचन आणि अवलोकन केले. फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.देसाई व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.माने यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. दोन्ही विद्वान विधिज्ञ यांनी त्यांचा अर्ज आणि लेखी म्हणण्यातील कथनांचा पुर्नच्चार तोंडी युक्तीवादा दरम्यान केला.

५. फिर्यादीने त्याच्या कथनांच्या पृष्ठयर्थ खालील न्यायनिवाडे दाखल केले.

1. M/s R.R.Builders and Developers and ors Vs State of U.P. and Anr., AIRonline 2023 ALL 318.
2. Subramanium Sethuraman Vs State of Maharashtra and another, 2004 AIR SCW 5326.
3. Mukund Manohar Wazalwar Vs Eknath Bajirao Hatwar (Dead) by LRs. AIRonline 2023 BOM 2360.

६. दोन्ही पक्षांची विरोधाभासी कथनांच्या पार्श्वभुमीवर अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत खटला फिर्यादी याने चलनक्षम दस्तऐवज अधिनियम कलम १३८ प्रमाणे दाखल केल्याचे दिसून येते. आरोपी याने प्रस्तुत अर्जान्वये त्यांना प्रस्तुत खटल्यातून दोषमुक्त करण्यात यावे अशी विनंती केली असल्याचे दिसून येते. सदर अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपी यांनी बँक ऑफ इंडिया शाखा शाहुपूरी, कोल्हापूर या बँकेचा रक्कम रु.५,००,०००/– इतक्या रक्कमेचा चेक नं.११३४७६ देवून सदर चेक बँकेत वटविणेकरीता भरुन कथित व्यवहारातील रक्कम त्याद्वारे मिळणेची हमी दिली होती. फिर्यादी याने कथित धनादेश त्याचे खाते असणा–या स्टेट बँक शाखा मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेत दि.२२/१२/२०२२ रोजी भरला असता सदर चेक दि.२७/१२/२०१२ रोजी "फंडस इनसफिशिएंट" अशा शे–यानिशी चेक रिटर्न मेमोसहीत परत आल्याने फिर्यादीने आरोपीस दि.१४/०१/२०१३ रोजी लेखी डिमांड

नोटीस देवून कथित धनादेशातील रक्कमेची मागणी केली. सदर नोटीसची आरोपी यास इंटीमेशन मिळून देखील त्याने कथित देय रक्कम दिली नसल्यामुळे प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

७. फिर्यादीमधील कथनांचे सुक्ष्मपणे वाचन आणि अवलोकन केले असता प्रस्तुत फिर्यादी अन्वये नि.१४ अन्वये मा.विद्वान पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द अपराधाचे विवरण तयार केल्याचे व आरोपी याने त्यास ते कबूल नसल्याचे सांगून प्रस्तुत खटल्यात संपरिक्षेची सुरवात झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत खटल्यात फिर्यादीने त्याचा पुरावा दाखल केल्याचे दिसून येते. तसेच कागदोपत्री पुरावाही अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येते.

८. प्रस्तुत खटल्यात अपराधाचे विवरण नोंद झाल्याची बाब आणि त्यानंतर फिर्यादी याने सरतपासाचे शपथपत्र सादर करुन उलटतपासास सामोरे जाण्याची दर्शविलेली तयारी तसेच फिर्यादीने त्याचा पुरावा सादर केल्याची बाब विचारात घेता आणि आरोपी यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे पुराव्याचा भाग असल्याने या टप्प्यावर आरोपी हा दोषमुक्त तथा डिस्चार्ज होण्यास पात्र नाहीत. तसेच आरोपी यास पुरेशी संधी असताना देखील त्याने प्रस्तुत अर्ज योग्य त्या टप्प्यावर दाखल केला असल्याचे दिसून येत नाही. त्या कारणास्तवही प्रस्तुत अर्ज टिकाऊ नाही. उलटपक्षी माझे विद्वान पूर्व पिठासिन अधिकारी यांनी फिर्यादी याने सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री प्रथमदर्शनी स्वरुपाच्या पुराव्याचे अवलोकन करुन आरोपीविरुध्द फिर्यादीत नमूद आरोपांबाबत आधार असल्याने त्याचेविरुध्द अपराधाचे विवरण तयार केल्याचे दिसून येते. प्रकरणामध्ये कागदपत्रे व उलटतपास यावरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता येईल. फिर्यादीमधील सत्यता व असत्यता ही अंतिम निकालाने निश्चित होईल. फिर्यादीने अभिलेखावर त्यांच्या कथनांच्या पृष्ठयर्थ सादर केलेल्या न्यायनिवांडयाचे मी प्रस्तुत खटल्यातील विशिष्ट वस्तुस्थिती आणि परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर वाचन आणि अवलोकन केले असता सदर न्यायनिवाडयांमधील प्रमाण व कायदा प्रस्तुत कामी फिर्यादीस मदत करतात. उपरोक्त विवेचन आणि विश्लेषण विचारात घेता प्रस्तुत अर्ज मी

मंजूर करणे न्यायोचित व उचित समजत नाही. करिता मी खालीलप्रमाणे न्यायोचित आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by NITIN RAMESH BHALGAT
Date: 2025.04.16 16:29:58 +0530

कोल्हापूर

दिनांक – १६/०४/२०२५.

( एन.आर.भळगट )

३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोल्हापूर.